# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 03/08/2021 (मंगळवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावर दहेगाव रंगारी येथे दि. 01/08/2021 चे 15.00 वा. ते दि. 02/08/2021 चे 08.00 वा. चे फिर्यादी नामे– सौ संगिता सुरेश शेलारे, वय 47 वर्ष, रा. वार्ड क्र 03 दहेगाव रंगारी या आपले राहाते घराला कुलुप लावुन नागपुर येथे गेल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराचे दाराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी आलमीरच्या तिजोरीमध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने असा एकुण कि. 61,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गौरीशंकर गोपाल देशमुख, वय 25 वर्ष, रा. सिरसोली यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ठाकरे मो. क्र. 9822764999 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावरील मौजा तिलक वार्ड छोरीया ले आउट रामटेक येथे दि. 02/08/2021 चे 10.30 वा. ते 16.30 वा. सुमारास फिर्यादीचा नामे– ज्ञानेश्वर चुडाराम बावनकर, रा. वार्ड क्र. 5 रामटेक हे आपल्या घराला कुलुप लावून डियुटी वर गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचा कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने हॉल मधील ओनीडा कंम्पनीचा लईडी किमती 25,000/–रू. व चांदीचे दागीने कि. 1,250/–रू. असा एकुण कि. 26,250/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राजेंद्र अडामे मो.क्र. 9637400873 हे करीत आहे.

3) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर मौजा पवनी येथे फिर्यादि नामे– नितीन सुरेन्द्र जैस्वाल, वय 40 वर्ष, रा. पवनी हे सकाळी रोडने मॉनिंग वॉक करित असतांना त्यांना त्यांचे बियर दुकानाचे अर्धवट शटर खुले दिसले. फिर्यादिने जवळ जाउन पाहीले असता त्यांना बियर शॅपीचे शटरचे कुलुपचे दोन कळया कटरने तुटलेले दिसले. दि. 02/08/2021 चे मध्यरात्री 01.00 ते सकाळी 4.00 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे बियर दुकानाचे कटरच्या सहायाने कुलुपच्या दोन कळया तोडुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने बियर दुकानाचे कॅश काउंटर मधुन नगदी 17,019/–रू. व विदेश दारू 20 निपा एकुण कि. 4,000/–रू. व बियर दुकान मधील सी .पी. प्लस कसमिस डि.व्हि.आर मशीन कि. 5,000/–रू. असा एकुण कि. 26,019/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशी संदिप नागोसे मो.नं. 7972212132 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर